RNI No. MAHBIL /2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष १२, अंक २१(२)] बुधवार, एप्रिल १, २०२६/चैत्र ११, शके १९४८ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ११.००

**असाधारण क्रमांक ३१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सक्षम प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांजकडून**

**अधिसूचना**

**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३.**

**मौजे उसाटणे व बुर्दुल ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत तळोजा एम.आय. डी.सी. ते एन.एच-४ रस्त्याचे बांधकाम या प्रकल्पासाठी भूसंपादन.**

क्रमांक भुसं/तळो. एम.आय.डी.सी ते एन.एच-४/उसाटणे, बुर्दुल/फेरमुदतवाढ/जा.क्र. २८/२०२६.— भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम २५ मध्ये नमूद केले आहे की, जिल्हाधिकारी कलम १९ अन्वये घोषणा प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून बारा महिन्यांच्या कालावधीत निवाडा देतील आणि जर त्या कालावधीत निवाडा देण्यात आला नाही तर, भूमी संपादनाची संपूर्ण कार्यवाही व्यपगत होईल.

परंतु, समुचित सरकारला, त्याचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तर, बारा महिन्यांच्या कालावधीत वाढ करण्याचा अधिकार असेल अशी तरतूद आहे.

परंतु, आणखी असे की, कालावधी वाढविण्याचा असा कोणताही निर्णय, लेखी स्वरुपात नोंदविण्यात येईल आणि तो अधिसूचित करण्यात येईल आणि संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावर टाकण्यात येईल.

मौजे आसोडे व नाऱ्हेण, ता. अंबरनाथ, जि. ठाणे येथील भूसंपादन प्रकरणात प्रारुप/अंतिम निवाड्याची प्रक्रिया प्रशासकीय सौकार्याच्या दृष्टीने मंजुर करण्याकरिता अडचणी येत होत्या. त्यामुळे सदर अधिनियमाचे कलम २५ मधील तरतुदी विचारात घेता १२ महिन्यांच्या कालावधी पर्यंत समूचित शासन यांचे स्तरावरून मुदतवाढ घेणे आवश्यक होते. जर निवाड्यास मुदतवाढ न मिळाल्यास सदर प्रकरणात पुन्हा नव्याने कलम ११ (१) पासून सर्व प्रक्रिया करावी लागणार होती. त्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान होऊन भूसंपादन प्रक्रियेस विलंब होण्याची शक्यता होती.

उक्त अधिनियमाच्या कलम २५ अन्वये समूचित शासन असलेले मा. जिल्हाधिकारी या नात्याने प्रकरणात १२ महिन्याच्या कालावधीत वाढ करण्याचा असलेला अधिकार वापरुन खालील प्रकरणातील अंतिम निवाडा पारित करण्याच्या कालावधीत मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांनी ६ (सहा) महिन्यांची फेरमुदतवाढ मंजुर केलेली असून सदर मुदतवाढीचे अनुषंगाने अधिसूचना निर्गमित करून ती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याचे निर्देश दिले आहेत.

## अनुसूची - एक

## जमिनीचा तपशील

## मौजे - उसाटणे, बुर्दुल, ता. अंबरनाथ, जि. ठाणे

| अ.क्र. (१) | गावाचे नाव (२) | तालुका (३) | स. नं. (४) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे. आर.) (५) |
|---|---|---|---|---|
| १ | उसाटणे | अंबरनाथ | २३ | ०.०४.८८ |
| २ | उसाटणे | अंबरनाथ | २४/१/१ | ०.१५.४७ |
| ३ | उसाटणे | अंबरनाथ | २४/१/२ | ०.११.९८ |
| ४ | उसाटणे | अंबरनाथ | २८/११ | ०.१३.०५ |
| ५ | उसाटणे | अंबरनाथ | २५/१/१ | ०.२१.९५ |
| ६ | उसाटणे | अंबरनाथ | २५/१/२ | ०.०१.५६ |
| ७ | उसाटणे | अंबरनाथ | २७/१/१ | ०.०८.६६ |
| ८ | उसाटणे | अंबरनाथ | २७/१/२ | ०.०९.४० |
| ९ | उसाटणे | अंबरनाथ | २७/२ | ०.०२.१६ |
| १० | उसाटणे | अंबरनाथ | २७/३ | ०.२१.४८ |
| ११ | उसाटणे | अंबरनाथ | ४०/१ | ०.००.९५ |
| १२ | उसाटणे | अंबरनाथ | ४०/३ | ०.०४.१० |
| १३ | उसाटणे | अंबरनाथ | ४०/४ | ०.१८.४६ |
| १४ | उसाटणे | अंबरनाथ | ४०/५ | ०.३२.६५ |
| १५ | उसाटणे | अंबरनाथ | ४०/६/अ | ०.१४.१६ |
| १६ | उसाटणे | अंबरनाथ | ४०/६/ब | ०.२९.४४ |
| १७ | उसाटणे | अंबरनाथ | ४०/८ पै | ०.०२.०० |
| १८ | उसाटणे | अंबरनाथ | ३९/२/ब | ०.०५.४७ |
| | | | **एकूण** | **२.१७.८२** |

| अ.क्र. (१) | गावाचे नाव (२) | तालुका (३) | स. नं. (४) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे. आर.) (५) |
|---|---|---|---|---|
| १ | बुर्दुल | अंबरनाथ | ६/१२/अ | ०.२०.९८ |
| २ | बुर्दुल | अंबरनाथ | ६/१२/ब | ०.२७.३६ |
| ३ | बुर्दुल | अंबरनाथ | ६/१२/क | ०.३३.५५ |
| ४ | बुर्दुल | अंबरनाथ | १८/१ | ०.०५.५३ |
| ५ | बुर्दुल | अंबरनाथ | १८/२ | ०.०३.८५ |
| ६ | बुर्दुल | अंबरनाथ | १८/३ | ०.०२.९२ |
| ७ | बुर्दुल | अंबरनाथ | १७ | ०.३५.७२ |
| ८ | बुर्दुल | अंबरनाथ | २५ | ०.०६.६५ |
| ९ | बुर्दुल | अंबरनाथ | २६ | ०.६७.४० |

| अ.क्र. (१) | गावाचे नाव (२) | तालुका (३) | स. नं. (४) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे. आर.) (५) |
|---|---|---|---|---|
| १० | बुर्दुल | अंबरनाथ | २७ | ०.३०.२८ |
| ११ | बुर्दुल | अंबरनाथ | २९/१ | ०.१९.०० |
| १२ | बुर्दुल | अंबरनाथ | २९/२ | ०.००.३७ |
| १३ | बुर्दुल | अंबरनाथ | २९/३ | ०.०८.७१ |
| १४ | बुर्दुल | अंबरनाथ | २९/७ | ०.१९.३० |
| | | | **एकूण** | **२.८१.६२** |

**अनुसूची दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**

| | | |
|---|---|---|
| प्रकल्पाचे नाव | :- | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत विकास आराखड्यातील प्रस्तावित तळोजा एम.आय.डी.सी. ते एन.एच.-४ रस्ता प्रकल्प. |
| प्रकल्पाचे वर्णन | :- | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत विकास आराखड्यातील प्रस्तावित तळोजा एम.आय.डी.सी. ते एन.एच.-४ रस्ता प्रकल्प या प्रकल्पात ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ तालुक्यातील मौजे उसाटणे व बुर्दुल यांचे एकूण क्षेत्र ४.९९.४४ हे.आर. संपादित होत आहे. |
| समाजाला मिळणारे लाभ | :- | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत विकास आराखड्यातील प्रस्तावित तळोजा एम.आय.डी.सी. ते एन.एच.-४ रस्ता प्रकल्पाचे बांधकाम करणे, त्याचा वापर करणे व देखभाल करणे या कामी रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.<br>स्थानिक लोकांना त्यांचे कौशल्य आणि अनुभव यानुसार त्या जागेतील प्रचलित नियमानुसार रोजगाराच्या संधी मिळतील.<br>तसेच त्या प्रकल्पामुळे प्रवासी वाहतुक वाढ, सुरक्षित आणि जलद प्रवास, भौगोलिक आणि सामाजिक दृष्टीने सर्वकषविकास, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती पर्यावरण स्थिरता या बाबी अभिप्रेत आहेत. |

**अनुसूची तीन**

**पुनर्वसन क्षेत्राचे वर्णन**

**गावाचे नाव : मौजे उसाटणे व बुर्दुल, तालुका –अंबरनाथ जि. ठाणे**

| अ.क्र. | भूमापन क्रमांक किंवा गट नंबर | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## अनुसूची चार

## (पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

मौजे उसाटणे व बुर्दुल, तालुका अंबरनाथ, जि. ठाणे येथील एकूण क्षेत्र ४.९९.४४ हे.आर. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विस्तारीत मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत विकास आराखड्यातील प्रस्तावित तळोजा एम.आय.डी.सी. ते एन.एच-४ रस्ता प्रकल्पासाठी संपादन होत आहे. कोणीही खातेदार विस्थापित होत नसल्याने पुनर्वसन व पुनर्वसाहत करणेचा प्रश्न उद्भवत नाही.

**विजयानंद शर्मा,**
सक्षम प्राधिकारी
तथा उपविभागीय अधिकारी,
उल्हासनगर उपविभाग उल्हासनगर.

उल्हासनगर,
दिनांक ३० जानेवारी २०२६.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.